जाहिरात वितरण धोरण दूरचित्रवाणी वाहिन्यांना जाहिराती देण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : मावज-२०१८/प्र.क्र.२१९/३४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: - २९ मे, २०१८

वाचा : (१) शासन निर्णय क्र. जाहिरात २००९/प्र.क्र.१३७/३४, दि. ३१ ऑगस्ट, २००९
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०१८/प्र.क्र.२९९/३४ दि.०६.०१.२०१८
(३) माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र. वृत्तचित्र-२०१८/दूरचित्रवाणी वाहिन्या दर/ का-७/३३ दि.१४ मे,२०१८

प्रस्तावना:-

आकाशवाणी, दूरदर्शनसह अन्य दूरचित्रवाहिन्यांना द्यावयाच्या शासकीय जाहिराती संदर्भात जाहिरात आणि दृश्य प्रसिध्दी संचालनालयाचे(DAVP) धोरण अवलंबिण्यास संदर्भ-१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आकाशवाणी, दूरदर्शन व अन्य दूरचित्रवाहिन्या या माध्यमांना देण्यात येणाऱ्या जाहिरातीच्या संदर्भात DAVP ने मान्य केलेले दर अंमलात आणले जातात. जाहिरात आणि दृश्य प्रसिध्दी संचालनालय(DAVP) ने दि.२३.४.२०१८ अन्वये नवीन दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या दर निश्चित केले असून त्या यादीमध्ये काही मराठी दूरचित्रवाहिन्यांची नांवे नाहीत. त्यामुळे या वाहिन्यांना कोणत्या दराने जाहिराती द्याव्यात, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय:-

शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या जाहिराती या मराठी भाषेतून देणे अपेक्षित आहे. तथापि जाहिरात आणि दृश्य प्रसिध्दी संचालनालय(DAVP) ने दि.२३.४.२०१८ च्या आदेशान्वये प्रसिध्द केलेल्या दूरचित्रवाहिन्यांच्या यादीमध्ये काही मराठी चित्रवाहिन्यांची नांवे समाविष्ट नाहीत. त्यामुळे जाहिरात आणि दृश्य प्रसिध्दी संचालनालय DAVP च्या नव्या दरामध्ये ज्या वाहिन्या समाविष्ट नाहीत, अशा दूरचित्रवाहिन्यांना जाहिराती देतांना जाहिरात आणि दृश्य प्रसिध्दी संचालनालय(DAVP) ने मंजूर केलेल्या पूर्वी दराने नवीन यादी/दर होईपर्यंत /अस्तित्वात येईपर्यंत सन २०१८-१९ या एक वर्षाच्या कालावधीसाठी शासन मान्यता देण्यांत येत आहे. जाहिरात आणि दृश्य प्रसिध्दी संचालनालय(DAVP) च्या दि. २३.०४.२०१८ च्या आदेशामध्ये समाविष्ट असलेल्या दूरचित्रवाहिन्यांना मात्र जाहिरात आणि दृश्य प्रसिध्दी संचालनालय (DAVP) च्या पूर्वीच्या मान्य दरानुसारच जाहिराती देण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०५३०१०३६३९८५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.05.30 10:37:59 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्रयांचे सचिव
३. मुख्यमंत्रयांचे विशेष कार्य अधिकारी(माध्यम सल्लागार)
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री/यांचे खाजगी सचिव
५. मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
६. सर्व मंत्रालयीन विभाग
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१०.सर्व मंडळे/महामंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था/शासनाच्या स्वायत्त संस्था
११.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१२.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१३.प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१४.महालेखापाल, महाराष्ट्र १/२,(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१५.महालेखापाल, महाराष्ट्र १/२,(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
१६.अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
१८.संचालक(माहिती), नागपूर-अमरावती
१९. संचालक(माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली
२०. उप संचालक(माहिती), नाशिक, पुणे, औरंगाबार, अमरावती, कोकण, कोल्हापूर विभाग
२१. सर्व जिल्हा माहिती अधिकारी
२२. सर्व उपमाहिती कार्यालये
२३. निवडनस्ती.